लातूर भूकंप

LATUR BHUKAMP

संपादक: अशोक चिंचोले

सांज दैनिक : शनिवार - १५ जुलै २०२३
वर्ष - ३७ वे
अंक - १०९
पाने - ४

किंमत २ रूपये

E-Mail : dailybhukamp@gmail.com
RNI No. MAHMAR/2012/42770
☎ : -9422072823,251822
epaper.dainikbhukamp.com







## त्यांच्या मते....

▣ शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी एकत्रीतपणे लोकसभा निवडणूक लढवणार हे ऐकायला थोडं अवघड वाटतं, पण काहि बेरजेचे गणितं असतात.

-एकनाथ शिंदे

गणितात 'वजाबाकी'ही असते. तसे झाले तर ते ऐकायला अवघड वाटायला नको.

▣ ना. छगन भुजबळ यांना जिवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी तरूणाला करण्यात आलेली अटक बेकायदा.

- एक बातमी

घाई आणि कुणाला तरी खुश करण्यासाठी कृती केल्याचा दुष्परिणाम दुसरे काय

▣ राज्यात शिक्षक भरतीचा आजच जीआर काढणार असून पहिल्या टप्प्यात ३० हजार शिक्षकांची भरती होणार आहे.

- शिक्षणमंत्री दीपक केसरकर

मग सेवानिवृत्त शिक्षकांना कंत्राटी शिक्षक म्हणून भरती प्रक्रिया चालू केली होती, त्याचं काय होणार?

▣ सद्या जे चालले आहे, ते पाहता, आमदार म्हणून घ्यायची लाज वाटते .

-आ. विजय वडेट्टीवार

आणि आम्हाला 'मतदार' म्हणून घ्यायची लाज वाटतेय.

# पोटदुखीवर रामबाण डॉ. एकनाथ शिंदे-फडणवीस



मुंबई : सध्याचे राज्य सरकार विविध योजना घेवून शासनाच्या दारी जात आहे, असे असताना अनेकांना पोटदुखी होत आहे. त्या पोटदुखीवर रामबाण उपाय म्हणजे डॉ. एकनाथ शिंदे आहे. त्यांच्यामुळे काही फरक पडला नाही तर उपमुख्यमंत्री अजितदादा आहेतच, असे विधान उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी केले.

आज नाशिक येथे शासन आपल्या दारी या कार्यक्रमा दरम्यान उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस हे बोलत होते. खातेवाटप झाल्यानंतर आज नाशिक येथे शासनाचा शासन आपल्या दारी हा कार्यक्रम होत आहे. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार हे उपस्थित आहेत. या कार्यक्रमा दरम्यान बोलत असताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपण राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात जाऊन शासन आपल्या दारी हा उपक्रम राबविणार असल्याचे सांगितले आहे. हा उपक्रम म्हणजे जनतेला विविध योजनांचा लाभ देणे आहे. नाशिक येथे हा कार्यक्रम होत आहे. हा कार्यक्रम शासकीय योजनांचा कुंभमेळाच आहे. कुंभमेळ्याच्या सेवा तिर्थावर जनतेची सेवा करण्याची संधी आम्हाला मिळाली आहे. पण, अनेकदा जनतेची चांगली कामे करत असताना काहिंच्या पोटात दुखते आहे. त्यांच्या पोटदुखीवर रामबाण उपाय म्हणजे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आहेत. त्यांच्यानेही फरक पडला नाही तर आता अजितदादा आहेतच, अशी टिप्पणीही देवेंद्र फडणवीस यांनी केली. शासन आपल्या दारी या कार्यक्रमात राष्ट्रवादीचे झेंडे कमी दिसत होते. आज नाशिक येथील कार्यक्रमात सेना-भाजपासोबत राष्ट्रवादीचेही झेंडे लावण्यात आल्याचे निदर्शनास येत होते. देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या मागणीनुसार दिवसा वीज मिळावी म्हणून मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना चालू केली आहे. तसेच प्रत्येक गावात ॲग्री बिझनेस सोसायटी बनविण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना फायदा होईल. हे सरकार महिला व शेवटच्या माणसापर्यंत शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचेही ना. फडणवीस यांनी स्पष्ट केले.

## उपमुख्यमंत्री अजित पवार सिल्वर ओकवर

मुंबई : खातेवाटप जाहीर झाल्यानंतर अजित पवार सिल्वर ओकवर गेले. तब्बल अर्धा तास अजित पवार सिल्वर ओकवर होते. अजित पवारांचं सिल्वर ओकवर जाणं, त्यावेळी शरद पवारही उपस्थित असणं, याची राज्याच्या राजकारणात जोरदार चर्चा रंगली होती. अखेर आज नाशकात बोलताना स्वतः अजित पवारांनीच सिल्वर ओकवर जाण्याचं कारण स्पष्ट केलं आहे. काल दिवसभर अनेक कामांमुळे दुपारी सिल्वर ओकवर जायला जमले नाही, रात्री उशिरा गेलो. माझं अंतर्मन म्हणालं, आपण सिल्वर ओकवर गेलं पाहिजे, म्हणून गेलो. राजकारण राजकारणाच्या ठिकाणी, कुटुंब कुटुंबांच्या ठिकाणी आहे. सर्वांची भेट घेतली, बोललो., असं स्पष्टीकरण उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सिल्वर ओक येथील भेटीवर दिलं आहे.

# अभिनेते रवींद्र महाजनी यांचा नैसर्गीक मृत्यू की आत्महत्या

## दरवाजा तोडून बाहेर काढण्यात आला मृतदेह

मुंबई : मराठी चित्रपटसृष्टीतील विनोद खन्ना म्हणून ओळखले जाणारे रविंद्र महाजनी (वय ७७ ) या नामवंत अभिनेत्याचा आज सकाळी तळेगाव दाभाडे येथील आंबी गावातील एका सोसायटीतील ३११ क्रमांकाच्या फ्लॅटमध्ये मृतदेह आढळून आला. फ्लॅटमधून दुर्गंधी येत असल्याने शेजाऱ्यांनी तक्रार केल्यानंतर पोलिसांनी दरवाजा तोडून आत प्रवेश केला तेंव्हा रविंद्र महाजनी यांचा मृतदेह आढळून आला. दोन ते तीन दिवसांपूर्वी त्यांचा मृत्यू झाला असावा असा अंदाज आहे. रविंद्र महाजनी यांची ही आत्महत्या की नैसर्गीक मृत्यू हे अद्याप स्पष्ट झाले नाही.


सुमारे तीन दिवसांपूर्वी महाजनी यांचा मृत्यू झाला असावा, असे डॉक्टरांचे म्हणणे आहे. फ्लॅटमधून दुर्गंधी येऊ लागल्याने शेजाऱ्यांनी पोलिसांना याबाबत माहिती दिली. पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी घराचा दरवाजा तोडला, त्यात महाजनी मृतावस्थेत आढळून आले. मृतदेह पोस्टमॉर्टमसाठी पाठवण्यात आला आहे.



रवींद्र यांनी ७० ते ८० च्या दशकात अनेक शानदार चित्रपटांमध्ये काम केले. जरी सुरुवातीला त्यांना खूप अडचणींचा सामना करावा लागला. एक वेळ अशी होती की खर्च भागवण्यासाठी त्यांना टॅक्सीही चालवावी लागली. रवींद्रच्या लूकमुळे त्यांना मराठी चित्रपटसृष्टीतील विनोद खन्ना म्हटले जायचे. रवींद्र महाजनी यांचा 'देवता' हा चित्रपट लोकांना खूप आवडला. याशिवाय 'मुंबईचा फौजदार', 'झुंज', 'कळत नकळत', लक्ष्मी, दुनिया करे सलाम, गोंधळात गोंधळ या चित्रपटांमध्ये महाजनी यांनी दमदार अभिनय केला. १९८७-१९८८ पर्यंत त्यांनी अनेक मराठी चित्रपट केले. तर त्याचे बेलभंडार, अपराध मीच केला ही नाटकेही गाजली होती. गश्मीर महाजनी हा मराठी इंडस्ट्रीतील एक उत्तम अभिनेता आहे. तो स्टॉप प्लस सीरियल इम्लीमध्ये दिसला होता, ज्यामध्ये त्याच्यासोबत सुंबुल तौकीर दिसली होती. दुसरीकडे, गश्मीरने झलक दिखला जा-१० या रिॲलिटी शोमध्ये आपल्या नेत्रदीपक नृत्याने सर्वांना आश्चर्यचकित केले. अभिनयासोबतच गश्मीर कोरिओग्राफर आणि थिएटर डायरेक्टर देखील आहे. करी ऑन मराठा, दुनागिरी का राज, देऊळबंद या मराठी चित्रपटांमध्ये त्याने काम केले आहे.

रविंद्र महाजनी हे तळेगाव दाभाडे आंबी गावात एका सोसायटीमध्ये राहत होते. सात ते आठ महिन्यापूर्वीपासून ते राहायला आले. त्यांचा हा फ्लॅट भाड्याचा फ्लॅट होता असे सांगण्यात येते. आजारी असल्याने एकांत मिळावा म्हणून ते या फ्लॅटमध्ये राहत होते, असे कळते. रविंद्र महाजनी यांचा मृतदेह पोलिसांना अस्ताव्यस्त स्वरूपात पडल्याचे आढळून आले. ते राहत असलेल्या फ्लॅटमधील साहित्य देखील अस्ताव्यस्त होते. त्यांचा मृत्यू हा आत्महत्या आहे की, नैसर्गीक हे शवविच्छेदनानंतरच लक्षात येणार आहे.

# केंद्रेवाडीच्या जवानास अरूणाचलमध्ये वीरमरण



लातूर : मौजे केंद्रेवाडी, ता. चाकूर येथील जवान, नायक संभाजी हरिश्चंद्र केंद्रे हे अरूणाचल राज्यात कार्यरत असताना हृदयविकारामुळे काल त्यांना वीरमरण आले आहे. उद्या रविवार दि. १६ जुलै रोजी सकाळी १०.०० वा. केंद्रेवाडी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

संभाजी हरिश्चंद्र केंद्रे (वय ३९) हे १७ वर्षापासून सैन्य दलात कर्तव्य बजावत होते. काल त्यांचा अरूणाचल राज्यात कर्तव्यावर हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, वडील, भाऊ असा परिवार आहे.

जवान संभाजी हरिश्चंद्र केंद्रे यांचे पार्थिव अरूणाचल प्रदेशातून आज रात्री १ वाजण्याच्या सुमारास विमानाने पुणे येथे येणार असून तेथून मोटारीने केंद्रेवाडी ता. चाकूर येथे आणण्यात येणार आहे. उद्या रविवारी सकाळी १० वाजता त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याची माहिती लातूर जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी शरद पांढरे यांनी दिली आहे.

# देहविक्रय करून घेणाऱ्या पुरूष व महिलेस अटक

## तीन पीडितांची सुटका

लातूर : लातूर शहरात एका ठिकाणी एक महिला व एक पुरूष आपल्या घरामध्ये बाहेरगावच्या महिलांना ठेऊन घेवून त्यांच्याकडून देहविक्रय करून घेत असल्याची माहिती मिळताच एमआयडीसी पोलीस व अनैतीक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाच्या वतीने छापा मारण्यात आला. त्यात एक पुरूष, एक महिला यांना अटक करून तीन पीडीत महिलांची सुटका करण्यात आली.

स्वतःच्या फायद्यासाठी लातूर शहर महानगरपालिका परिसरात एका घरात एक महिला व एक पुरूष बाहेरगावहून स्त्रियाला बोलावून घेवून त्यांना देहविक्रय करण्यास सांगून ग्राहकांकडून पैसे घेत असत. बाहेरगावहून बोलावण्यात आलेल्या स्त्रियांना राहण्याची, जेवणाची सोय करून नाममात्र पैसे दिले जात असत. उर्वरीत पैसे हे तो पुरूष व महिला ठेऊन घेवून व्यवसाय करीत असल्याची माहिती मिळाल्यावरून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अप्पर पोलीस अधीक्षक अजय देवरे, पोलीस उपअधीक्षक सुनील गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसी पोलीस तसेच अनैतीक मानवी वाहतूक विभागाच्या पोलीस अधिकारी, कर्मचारी यांनी त्या घरावर छापा मारून तेथून एक पुरूष व एक महिला यांना अटक करून त्यांच्या विरोधात भादंवि व अनैतीक व्यापार प्रतिबंध अधिनियम कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यावेळी अटक करण्यात आलेल्या महिला व पुरूषांकडून काही रोख रक्कम व मोबाईलही जप्त करण्यात आल्याचे वृत्त आहे.



## जि. प. शाळेच्या विद्यार्थ्यांना छत्री वाटप

लातूर येथील प्रभुराज प्रतिष्ठानच्या वतीने पावसाळा लक्षात घेवून खाडगाव रोड येथे असलेल्या जिल्हा परिषद प्रशालेतील विद्यार्थ्यांना छत्रीचे वाटप करण्यात आले. प्रभुराज प्रतिष्ठानच्या वतीने वेगवेगळ्या पद्धतीने सामाजीक कार्य करण्यात येते. या प्रतिष्ठानच्या वतीने पावसाळ्यात छत्र्या मिळाल्याने शाळेतील विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले होते. या प्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अजय कलशेट्टी, शाळेतील शिक्षक वृंद दिसत आहेत.

# बालेवाडीच्या धरतीवर लातूर-उदगीर येथे स्टेडीयम उभारू-क्रीडामंत्री ना. बनसोडे



लातूर : राज्याचा क्रीडामंत्री म्हणून काम करताना सर्व प्रकारच्या खेळांना आणि खेळाडूंना शासन स्तरावरून मदतीसह प्रोत्साहन देण्याची भूमिका असेल त्यातून खेळ आणि खेळाडू यांना वैभव प्राप्त करून देण्यासाठी काम करत राहू असे प्रतिपादन राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी केले.

कबड्डी महर्षी शंकरराव तथा बुवा साळवी यांची जयंती राज्यात कबड्डी दिन म्हणून महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनकडून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने जिल्हा क्रीडा संकूलात कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्यावेळी बुवा साळवी यांना अभिवादन करून क्रीडा मंत्री बोलत होते.

यावेळी जिल्हा क्रीडाधिकारी जगन्नाथ लकडे, कबड्डी खेळातील जीवनगौरव प्राप्त गणपतराव माने, राष्ट्रीय कबड्डी खेळाडू दयानंद सारोळे,राष्ट्रीय कबड्डीपंच लक्ष्मण बेल्हाळे, छत्रपती पुरस्कार विजेते रणजित चामले, उदगीरचे तालुका क्रीडा अधिकारी चंद्रकांत लोदगेकर, रेणापूरचे तालुका क्रीडा अधिकारी सुरेंद्र कराड, मकरंद सावे, व्यंकट बेंद्रे, जिल्ह्यातील ११३ क्रीडा शिक्षक, शिक्षिका उपस्थित होत्या.

लातूर जिल्ह्याला यापूर्वी दिलीपराव देशमुख यांच्या रूपाने पहिला तर दुसऱ्यांदा क्रीडा मंत्री म्हणून मला काम करण्याची संधी मिळाली आहे. यासंधीचे आपण सोने करू, क्रीडा क्षेत्रात काम करणाऱ्यांनी वेळोवेळी नावीन्यपूर्ण सूचना कराव्यात त्यांच्या योग्य त्या सूचनाची अंमलबजावणी केली जाईल. त्यामुळे खेळ आणि खेळाडू यांच्या कामगिरीत सुधारणा होईल. खेळाला वैभव प्राप्त करून देण्यासाठी देशातील उत्तमोत्तम क्रीडासंकुलाची पाहणी करून राज्यातही सर्वसोयीनीयुक्त क्रीडा संकुलं उभी करणे, सध्या अस्तित्वात असलेल्या क्रीडा संकुलात खेळाडूसाठी सुविधा निर्माण करून देणे. लातूर आणि उदगीर येथे बालेवाडी सारखे सुसज्ज स्टेडियम उभं करण्याचा आपला प्रयत्न राहणार असल्याचे क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी सांगितले.

आपल्यालाही खेळाची आवड आहे, लहानपणी ज्या जिल्हा क्रीडा संकुलात खेळलो आहे,त्याच क्रीडा संकुलात राज्याचा क्रीडा मंत्री म्हणून घोषणा झाल्यानंतर पहिलाच कार्यक्रम करतो आहे. हा योगायोगाने आलेला योग आनंददायी आहे.

## श्रीमती कमलबाई गर्जे यांचे निधन



लातूर : नांदगाव येथील गुंडेराव गर्जे यांच्या मातोश्री कमलबाई रामकृष्ण गर्जे (वय ९५) यांचे आज सकाळी निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा आज दुपारी गर्जे फार्म हाऊस बसवंतपूर साई गजानन नगरी राहत्या घरून निघणार आहे. त्यांच्या पार्थिव देहावर नांदगाव स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, जावई, नातू असा परिवार आहे

# देवणीत मुलींसाठी शासकीय वसतीगृह २१.४० कोटीच्या निधीस मंजुरी

लातूर : निलंगा मतदारसंघातंर्गत असलेल्या देवणी तालुक्यातील शंभर मुलींसाठी शासकीय निवासी शाळा उभारली जावी अशी मागणी माजी मंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर यांनी केली होती. याबाबत सातत्याने पाठपुरावा केल्याने आता देवणी तालुक्यात शंभर मुलींसाठी शासकीय वस्तीगृह उभारण्यासाठी २१.४० कोटी रूपयांच्या निधीस मंजूरी मिळाली आहे. या माध्यमातून लवकरच या वस्तीगृहाच्या कामास सुरुवात करण्यात येईल असा विश्र्वास देऊन माजी मंत्री आ. निलंगेकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार व्यक्त केले आहेत.

निलंगा मतदारसंघातील देवणी हा तालुका महाराष्ट्र व कर्नाटक राज्याच्या सिमेवर आहे. या तालुक्यातील देवणी शहरात शिक्षण घेण्यासाठी तालुक्यासह कर्नाटक राज्यातील विद्यार्थी शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणात येतात. त्यामुळेच देवणी हे शैक्षणिक केंद्र म्हणून ओळखले जाते. देवणी येथे शिक्षणासाठी येणार्या विद्यार्थ्यांमध्ये विद्यार्थीनींची संख्याही लक्षणीय आहे. मुलींना शिक्षण मिळावे याकरीता केंद्रासह राज्य सरकारच्या वतीने विविध उपक्रम आणि योजना राबविण्यात येत आहेत. विशेष म्हणजे समाजातील प्रत्येक घटकात असलेल्या विद्यार्थीना शिक्षण मिळावे याकरीता विशेष प्राधान्य देऊन बेटी बचाव बेटी पढाव हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. याच माध्यमातूनच देवणी तालुक्यात अनुसुचीत जाती व नवबौद्ध समाजातील मुलींकरता शासकीय शाळा व वस्तीगृह उभारले जावे अशी




मागणी माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी केली होती. याबाबत आवश्यय असणारा प्रस्ताव दाखल करून त्याकरीता पाठपुरावा करण्यात येत होता. या पाठपुराव्याला यश आले आहे.

शासनाच्या वतीने देवणी तालुक्यात शंभर मुलींसाठी शासकीय वस्तीगृह उभारण्याच्या प्रस्तावास मंजूरी देऊन त्यांसाठी आवश्यक असणारा २१.४० कोटी रूपयांचा निधी मंजूर करण्यात आलेला आहे. या निधीच्या माध्यमातूनच लवकरच देवणी तालुक्यात चार मजली वस्तीगृह उभारण्याच्या कामास सुरुवात होईल असा विश्र्वास व्यक्त करून या वस्तीगृहाचा लाभ देवणी तालुक्यातील विद्यार्थीना होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली. त्याचबरोबर देवणी तालुका केवळ लातूर जिल्ह्यातच नव्हे तर राज्यातही शैक्षणिक केंद्र म्हणून नावलौकिक प्राप्त करेल असा विश्र्वासही माजीमंत्री आ. निलंगेकरांनी व्यक्त केला आहे. सदर वस्तीगृह उभारण्यास मंजूरी देऊन निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल देवणी तालुक्यातील नागरीकांच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांचे आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

# अदानी करणार आशियातील सर्वात मोठ्या धारावी झोपडपट्टीचा कायापालट

## पुनर्विकासाला मिळाली मंजुरी




आशियातील सर्वात मोठी झोपडपट्टी असलेल्या धारावीचा लवकरच कायापालट होणारआहे. मुंबईच्या धारावीचा पुनर्विकास करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने अदानी समूहाला मंजुरी दिली आहे. आता लवकरच अदानी समूह धारावी पुनर्विकास प्रकल्प सुरू करू शकतो. आम्ही तुम्हाला सांगतो, धारावी हे आशियातील सर्वात दाट लोकवस्तीचे ठिकाण आहे. त्याची लोकसंख्या सुमारे ८ अब्ज आहे.

आता महाराष्ट्र सरकारनेही या दाट लोकवस्तीच्या सुशोभिकरणाचे काम अदानी समूहाला दिले आहे. प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी एसव्हीआर श्रीनिवास यांनी सांगितले की, पुनर्विकास प्रकल्पासाठी शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. आता लवकरच पुरस्काराचे पत्रही दिले जाणार आहे. त्यानंतर अदानी समूह या प्रकल्पावर काम करण्यास सक्षम होईल.

धारावी ही आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये अदानी समूहाने धारावी झोपडपट्टीच्या पुनर्बांधणीसाठी बोली लावली होती. त्यावेळी अदानी समूहाने यासाठी ५०६९ कोटी रुपयांची बोली लावली होती. डीएलएफने २०२५ कोटी रुपयांची गुंतवणूक केली होती. धारावी हा आशिया खंडातील सर्वात दाट लोकवस्तीचा भाग आहे. येथील शिक्षण व स्वच्छतेची स्थिती अत्यंत वाईट आहे. आता मंजुरी मिळाल्यानंतर अदानी इन्फ्रा हे सुशोभीकरणाचे काम करणार आहे.

# शरीरापासून वेगळे झालेले डोके, नंतर पुन्हा जोडले, इस्रायलमध्ये झाले एक विचित्र ऑपरेशन!

डॉक्टरांना देवाचा दर्जा दिला जातो. इस्रायली डॉक्टरांच्या पथकाने हे सत्य असल्याचे सिद्ध केले आहे. इस्रायलमध्ये कारने धडक दिल्याने




१२ वर्षांच्या मुलाचे डोके त्याच्या मानेपासून वेगळे झाले होते. जे शस्त्रक्रियेनंतर पुन्हा जोडण्यात आले. याला चमत्कारच म्हणता येईल. अशा प्रकारची शस्त्रक्रिया करून कापलेले डोके पुन्हा जोडले गेल्याची फारच कमी प्रकरणे जगभर पाहिली आहेत.

द टाईम्स ऑफ इस्रायलमधील वृत्तानुसार, कार अपघातानंतर मुलाचे डोके त्याच्या पाठीच्या कण्याच्या वरच्या भागापासून अर्धे तुटले होते. या स्थितीला वैज्ञानिकदृष्ट्या द्विपक्षीय अटलांटो ओसीपीटल म्हणतात. अशा स्थितीत रुग्णाचा जीव वाचवणे कठीण असते. अपघातानंतर मुलाला विमानाने हाडासाह मेडिकल सेंटरमध्ये नेण्यात आले. जिथे त्याला तातडीच्या शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आले. मुलाचे डोके मानेपासून जवळजवळ पूर्णपणे विभक्त झाले होते. मात्र डॉक्टरांनी ही यशस्वी शस्त्रक्रिया करून मुलाला नवजीवन दिले आहे. या प्रकारच्या शस्त्रक्रियेसाठी विशेष डॉक्टरांची आवश्यकता असते.

या प्रकारची डोक्याची शस्त्रक्रिया मोठ्या व्यक्तीपेक्षा लहान मुलासाठी जास्त कठीण असते. डॉक्टरांच्या मते, ही सामान्य शस्त्रक्रिया नाही. विशेषत: मुले आणि किशोरवयीन मुलांसाठी, हे अजिबात नाही. हे करण्यासाठी सर्जनला ज्ञान आणि अनुभव आवश्यक असतो. अशा वेळी रुग्णाचा जीव वाचवणे हेही एक आव्हान असते, परंतु डॉक्टरांचा अनुभव आणि प्रगत तंत्रज्ञानाच्या मदतीने हे शक्य होऊ शकते.

मुलाच्या वडिलांनी क्षणभरही मुलाला सोडले नाही, त्यांनी त्याला गंभीर अवस्थेत रुग्णालयात नेले. आपल्या एकुलत्या एक मुलाला वाचवल्याबद्दल त्यांनी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांचे आभार मानले. मुलाच्या वडिलांनी सांगितले की, इतक्या धोकादायक अपघातानंतर मुलाच्या जगण्याची फारशी आशा नव्हती. त्यानंतरही डॉक्टरांनी त्यांना नवजीवन दिले. ट्रॉमा आणि ऑर्थोपेडिक्स टीमच्या मदतीने हे शक्य झाले.

# आयकर भरताना ही गोष्ट न सांगितल्यास भरावा लागेल १० लाखांचा दंड

आयकर विवरणपत्र भरण्याची अंतिम मुदत जवळ येत आहे. ३१ जुलैपूर्वी आयटीआर भरणे खूप महत्त्वाचे आहे. दरम्यान सध्या ही मुदत पुढे जाणे अपेक्षित नाही. जर तुम्ही शेवटच्या तारखेपूर्वी खळठ भरला नाही, तर तुम्हाला मोठा दंड भरावा लागू शकतो. नोकरी सोडून इतर मार्गाने पैसे कमावणारे बरेच लोक आहेत. तर काही परदेशात जाऊन नोकरी करतात. आता त्यांच्यासमोर प्रश्न उभा राहतो की त्यांनी आयटीआर भरावा की नाही इन्कम टॅक्स रिटर्न भरताना तुम्हाला तुमची सर्व कमाई सांगावी लागेल. आयटीआर भरताना तुम्ही कोणतीही माहिती लपवल्यास तुम्हाला १० लाखांपर्यंत दंड होऊ शकतो.

नुकतेच आयकर विभागाने सर्व करदात्यांना सतर्क केले आहे. आयकर विभागाने म्हटले आहे की ज्यांचे खाते किंवा उत्पन्न देशाबाहेर आहे अशा करदात्यांनी आयटीआर भरताना विदेशी मालमत्ता शेड्यूल भरणे आवश्यक आहे. हे विदेशी मालमत्ता शेड्यूल काय आहे आणि तुम्ही ते कसे दाखल करू शकता, ते आम्ही तुम्हाला सांगतो.

आयकर विभागाने ट्विट करून सर्व करदात्यांना सतर्क केले आहे. विभागाने म्हटले आहे की ज्या करदात्यांचे दुसऱ्या देशात खाते किंवा उत्पन्न आहे, त्यांनी मूल्यांकन वर्ष २०२३-२४ साठी आयटीआर भरताना परदेशी मालमत्ता शेड्यूल भरणे आवश्यक आहे. करदात्यांना हे सांगणे आवश्यक आहे की त्यांनी अशा प्रकरणांमध्ये त्यांचे सर्व परदेशी उत्पन्न आणि मालमत्तेची माहिती देणे आवश्यक आहे.

दुसरीकडे, जर एखाद्या करदात्याने ही माहिती लपवली तर आयकर विभाग त्याच्यावर कारवाई करू शकतो. आयटी विभागाचे म्हणणे आहे की काळा पैसा आणि कर कायदा २०१५ अंतर्गत अशा प्रकरणांमध्ये करदात्याकडून १० लाख रुपयांचा दंड वसूल केला जाऊ शकतो.

जर एखादी व्यक्ती एका आर्थिक वर्षात १८२ दिवस देशात (भारत) राहिली, तर त्याला निवासी मानले जाते. रहिवासी भारतीयांचे जागतिक उत्पन्न कराच्या कक्षेत येते. परदेशात मिळणारा पगार पगार हेडमधून मिळणाऱ्या उत्पन्नाखाली दाखवावा लागेल. तुम्हाला परकीय चलनात मिळणारा पगार रुपयात रूपांतरित करावा लागेल आणि नियोक्त्याचा तपशील द्यावा लागेल.

जर या पगारावर कोणत्याही प्रकारचा कर कापला गेला असेल, तर तुम्ही रिटर्नमध्ये दाखवून टॅक्स क्रेडिटचा दावा करू शकता. तुम्ही डबल टॅक्सेशन अवॉयडन्स ॲग्रीमेंट (DTAA) चा फायदा घेऊन दुहेरी कर टाळू शकता.

# वसुधैव कुटुंबकम



बऱ्याचदा आपण कित्येक घरांमध्ये बघतो की अख्ख्या जगाच्या समाजकार्याचा जणू ते विडाच उचलत असतात. अख्ख्या घरात म्हणजे घरातले आजी, आजोबा, आई, वडील, मुलं हेदेखील त्या समाजकार्यासाठी झटत असतात. हे किती प्रेरणादायी आहे असं मला वाटतं. अशा घरातील वातावरण पण बघा नेहमी समाधानी, आनंदी असंच आपल्याला दिसून येतं. अशा घरातील व्यक्तींच्या समाजाकडून खूप काही अपेक्षा नसतात, पण आपण समाजासाठी काहीतरी करीत राहणार ही मात्र त्यांची नेहमीच तळमळ असते. वसुधैव कुटुंबकम अशीच भावना त्यांच्या मनात असते.

अहो, आता काय सांगणार आजकाल समाजकार्य ही पण एक फॅशनच व्हायला लागली आहे. कितीतरी लोक असतात ती खरोखर मन लावून समाजकार्य करीत असतात. म्हणजे अक्षरशः स्वतःला वाहून घेतात या समाजकार्यासाठी आणि मी म्हणते त्यात चुकीचं नाही ना, बरोबरच आहे. आपण जर या समाजाचे काही घटक आहोत, तर या समाजाला आपल्याकडून काहीतरी परत दिलं गेलं तर त्यात एक वेगळंच समाधान असतं आणि यातूनच सामाजिक बांधिलकी याचीदेखील भावना निर्माण होते आणि या सामाजिक बांधिलकीची जाणीव एका दोघाला असून उपयोग नाही, तर सगळ्यांना किंवा अनेकांना याची जाणीव असली पाहिजे.

मग तो तुमच्या आजूबाजूचा समाज असो किंवा इतर कुठेही असो. आणि या समाज म्हणजे एखादी जात, धर्म असं न बघता माणसाने माणसासाठी केलेली मदत किंवा सहकार्य म्हणजे समाजकार्य असं मला वाटतं हं. यातूनच आपल्यातील जी माणुसकी असते तीही जागृत राहते. आपल्यामुळे एखाद्या व्यक्तीचे किंवा एखाद्या कुटुंबाचे एवढेच काय एखाद्या समाजाचे जर चांगले होत असेल आणि त्यातून जे मिळणारे समाधान असते ते खरोखरंच छान नाही का? अहो, इतकच काय पण आपण जे कार्य करीत असतो, काम करीत असतो ते आपल्या घरातली प्रत्येक व्यक्ती बघत असते आणि त्यापासून ते प्रोत्साहन आणि प्रेरणा पण घेत असतात.

बर्याचदा आपण कित्येक घरांमध्ये बघतो की अख्ख्या जगाच्या समाजकार्याचा जणू ते विडाच उचलत असतात. अख्ख्या घरात म्हणजे घरातले आजी, आजोबा, आई, वडील, मुलं हेदेखील त्या समाजकार्यासाठी झटत असतात. हे किती प्रेरणादायी आहे असं मला वाटतं. अशा घरातील वातावरण पण बघा नेहमी समाधानी, आनंदी असंच आपल्याला दिसून येतं. अशा घरातील व्यक्तींच्या समाजाकडून खूप काही अपेक्षा नसतात, पण आपण समाजासाठी काहीतरी करीत राहणार ही मात्र त्यांची नेहमीच तळमळ असते. वसुधैव कुटुंबकम अशीच भावना त्यांच्या मनात असते. अहो, ही खरंच वाखाणण्यासारखीच गोष्ट आहे. जगातल्या सगळ्यांनाच नाही जमत बरं का हे आणि जमलंच पाहिजे असाही माझा आग्रह नाही. केवळ सामाजिक बांधिलकीची भावना असावी एवढंच माझं मत आहे.

आणि हे सगळं करताना मला समाजाकडून काय मिळेल याची अपेक्षा करणं चुकीचं असं माझं मत आहे. नाहीतर कधी कधी काहींच्या मनात असे येते, 'मी त्याला मदत केली पण त्यांनी माझ्यासाठी काय केलं. काहीच नाही ना. मग मी कशाला विचार करू, द्या सोडून, मी नाही करणार यापुढे कोणाची मदत. त्या व्यक्तीचा किंवा त्या समाजाचा मला काय उपयोग. मला काय घेणं समाजाचं. मी नाही समाजकार्य वगैरे करीत बसणार. माझं माझं काही कमी आहे की मी त्या समाजाचं घेऊन बसू. कोणी सांगितलं नसती उठाठेव करायला. जाऊ दे ना राव बघू उद्या काय गरज पडली तर.' हा असा विचार करणारेदेखील अनेक जण असतात. गंमत वाटेल पण एक खरं आहे बरं का, तर काही लोकं फॅशन म्हणूनदेखील समाजकार्य करतात. अगदी मोठ्या टेच्यात सांगतात, 'हो बाई मी समाजकार्याच्या नावे एक कोर्सच केलाय मागे एकदा, तर मला समाजकार्य करायला फार आवडतं.'

हे सगळं बरोबर आहे किंवा बरोबर आणि चूक याचं गणित मांडण्यापेक्षा मला बर्याचदा असं वाटतं की आपल्याला काय बरोबर वाटतं ते करणं योग्य आहे. तरी यात काहींचं म्हणणं आहे की, समाजकार्य करण्यापेक्षा म्हणजे समाजकार्य तर केलंच पाहिजे नाही असं नाही, पण समाजकार्य करण्यापेक्षा आपल्या घरातलं सगळ्यांचं सुरळीत चाललंय की नाही याचीदेखील खात्री केली गेली पाहिजे. नाहीतर काय होतं काही घरांमध्ये समाजकार्य समाजकार्य करण्यापेक्षा घरात नाही व्यवस्थित शांती समाधान, क्लेश सतत सुरू असतात.

बाहेर समाजकार्य यापेक्षा आधी आपण आपलं कुटुंब मग आजूबाजूचा समाज. आजूबाजूची आपण म्हणत आपण आपलं कार्य सुरू ठेवलं पाहिजे असं मला वाटतं. आपल्या घरातूनच पहिले समाजकार्य सुरू झाले पाहिजे. घरातल्या काही अडचणी असतील तर त्या आधी सोडवणे. हे त्या अडचणी न बघता बाहेरची कार्य करीत राहायची हे कितपत बरोबर आहे किंवा चुकीचं आहे, हा एक प्रश्नच आहे बाबा. नाहीतर समाजाला सुधरवायला जाल, पण घर विस्कळीत किंवा पसरलेलं, असं तर होत नाही ना, याची थोडीशी काळजी घेतली पाहिजे बरं का.

खरंतर प्रत्येकाने ठरवलं ना तरी सहज शक्य आहे. प्रत्येकाने फक्त एवढंच ठरवायचं, आधी माझं घर समाधानी आहे की नाही. त्यांच्या सगळ्या गरजा पुरवल्या गेल्या की नाही. एकदा घर झालं की मग आजूबाजूचा समाज, मग त्याही पलीकडचा जो समाज असतो आणि मग असं करीत करीत इतर लोकांच्या गरजा किंवा समाधान करणं म्हणजे समाजकार्य करणं असं मला वाटतं. म्हणून तर म्हटलं ना समाजकार्य हे आपल्या घरापासून सुरू झालं पाहिजे. नाहीतर घरात नाही शांती समाधान आणि चाललेत जगात शांती पसरवायला. अरे सोशल वर्क आजकालची फॅशन आहे भाऊ, केलेच पाहिजे ना राव. घर काय घरातच आहे. घराकडे काय उद्या पण बघता येईल. उद्या नाही तर परवा बघता येईल. परवा नाही तर तेरवा बघता येईल. घरातल्यांची काय नेहमीची भुणभुण आहे.

अहो, असादेखील विचार कित्येक लोक करीत असतात. आता काय सांगायचं. वसुधैव कुटुंबकम वगैरे असे मोठे मोठे शब्द वापरायचे नाहीत. वापरले पाहिजे त्याबद्दल माझं काहीच दुमत नाही आणि तसं कार्य केलं पाहिजे याबद्दलदेखील वाद नाही, परंतु सगळयात आधी माझे आईवडील, माझी बायको किंवा माझा नवरा, माझी मुलं हे समाधानी आहेत का? ते झाल्यानंतर माझ्या आजूबाजूचा परिसर, आजूबाजूच्या व्यक्ती, माझे नातेवाईक हे समाधानी आहेत का? असा जर विचार केला गेला तर खरं समाजकार्य. काय मग मंडळी पटतंय ना? करूयात ना सुरुवात आपल्या घरापासूनच समाजकार्याची. हा विडा उचलूया ना सगळे मिळून. कारण आपण सुधारलो तर समाज सुधारणारच ही खात्री बाळगा मित्रांनो.

**-अर्चना दीक्षित**




वसुधैव कुटुम्बकम्

ONE EARTH • ONE FAMILY • ONE FUTURE




# पासवर्ड म्हणजे काय?

**भाग-४**

सध्याचे युग हे सोशल मीडिया चे युग आहे असे मानले जाते. सध्या मेसेज बॉक्स पासून ते

या विषयाच्या सदरात प्रवेश करण्यापूर्वी आपण आपल्या मोबाईल मधील लेन्स किंवा कोड स्कॅनर ॲप्लीकेशन चा वापर करून पुढील बारकोड ला स्कॅन केले असता या विषयाची सखोल माहिती व्हिडिओ आपल्या मोबाईल मध्ये पहावयास मिळेल. वेळोवेळी व्हिडिओ व विषयामध्ये समतोलता राखण्यासाठी आपण क्यूआर कोड व लिंक दिले आहेत त्याचा वापर करावा.

आपल्या बँक पर्यंत आपला सर्व काही डेटा आपल्या अकाउंट शी जोडला गेलेला असतो. आणि या अकाउंट ला इतरांपासून प्रोटेक्ट करत असतो तो आपला पासवर्ड.

पासवर्ड हा शब्द आपण अनेकदा ऐकलं आहे, पण हा पासवर्ड म्हणजे काय ? म्हणजेच what is password in marathi तो कसा काम करतो? पासवर्ड चे प्रकार आणि पासवर्ड चा इतिहास हे सर्व जाणून घेण्यासाठी आपण हा आजचा लेख पाहणार आहोत.

**पासवर्ड म्हणजे काय?**

पासवर्ड म्हणजेच संकेत शब्द होय. पासवर्ड हा एक इंग्रजी शब्द आहे पासवर्ड ला संकेतशब्द असे सुद्धा म्हटले जाते. पासवर्ड चा उपयोग हा वापरकर्त्याची म्हणजेच युजर ची ओळख सत्यापित करण्यासाठी वापरल्या जाणार्या वर्णांची एक स्ट्रिंग असते. पासवर्ड हे एक प्रकारचे रेस्ट्रिक्शन असते त्या शिवाय तुम्ही कोणत्याही




ॲक्सेस किंवा कोणत्याही अकाउंट मध्ये एन्ट्री करण्यासाठी पासवर्ड हा वापरला जातो. पासवर्ड सेट करताना त्यात सुद्धा अनेक प्रकार असतात त्यामध्ये ींशिीलरीश आणि श्रेशीलरीश शिवाय नंबर आणि वेगवेगळ्या चिन्हांचा सुद्धा उपयोग केला जातो. केवळ पासवर्ड हा सुरक्षा आणि पर्सनल व्हेरिफिकेशन साठी।मोठ्या प्रमाणात वापरला जातो.

मजबूत आणि सुरक्षित पासवर्ड हा कसा बनवायचा

प्रत्येक जण आपल्या मोबाइलला ला किंवा कोणत्याही डिजिटल उपकरणाला पासवर्ड ठेवतात त्यामध्ये सुद्धा प्रकार असतात ते म्हणजे सिंपल पासवर्ड, कॉम्प्लेक्स पासवर्ड आणि पॅटर्न किंवा कोड या प्रकारचे असतात.

१) सामान्य पासवर्ड:- या मध्ये आपण एकदम साधा पासवर्ड सेट करू शकतो. जेणेकरून तो लगेच डोक्यात राहील असा.

२) कॉम्प्लेक्स पासवर्ड:- या मध्ये आपण पासवर्ड सेट करताना अंक संख्या सांकेतिक स्थळ यांचा उपयोग सुद्धा केला जातो. कॉम्प्लेक्स पासवर्ड बनवणं हे खूपच सुरक्षित आहे.

३) पॅटर्न आणि कोड:- या मध्ये पॅटर्न चा उपयोग सुद्धा केला जातो त्याच बरोबर कोड चा सुद्धा उपयोग केला जातो. एक सुरक्षित पासवर्ड बनवण्यासाठी आपण पासवर्ड ची लांबी सुद्धा ठरवली पाहिजे ज्या मध्ये कीवर्ड नंबर आणि वेगवेगळ्या सांकेतिक शब्दांचा वापर करून आपला पासवर्ड हा अधिक मजबूत बनवू शकतो.

**पासवर्ड कोणत्या कोणत्या ठिकाणी वापरला जातो (uses of password)**

हे युग एक डिजिटल युग आहे त्यामुळे या डिजिटल युगात पासवर्ड आणि गोपनीयता खूप आवश्यक आणि महत्वाची बाब आहे. आजकाल सगळं



ऑनलाइन झालं आहे त्यामुळं माहिती सुरक्षित राहण्यासाठी पासवर्ड चा उपयोग प्रत्येक ठिकाणी केला जातो.

पासवर्ड चा वापर हा वेगवेगळे प्रकारची सोशल मीडिया अकाउंट, काही कंपनी चे अकाउंट वेगवेगळी ॲप्लिकेशन यांना सुद्धा पासवर्ड चा वापर करणं आवश्यक आहे. कोणत्याही अकाउंट मध्ये एन्ट्री करण्यासाठी किंवा माहिती ॲक्सेस करण्यासाठी पासवर्ड चा वापर मोठ्या प्रमाणात होतो.

**पासवर्ड चा इतिहास (history of password):-**

पहिला सांकेतिक शब्द हा मॅसाचुसेट्स इन्स्टिटच्यूट ऑफ टेक्नॉलॉजीने वेळ-सामायिकरण प्रणाली किंवा सीटीएसएस सादर केला तेव्हा संगणकात संकेतशब्दांचा वापर १९६१ पासूनचा आहे. सीटीएसएस ही एक प्रकारची ऑपरेटिंग सिस्टिम होती त्यामुळं त्याला लॉगिन करण्यासाठी तसेच कमांड साठी पासवर्ड वापरणे आवश्यक होते.

त्यानंतर सण १९७० मध्ये रॉबर्ट मॉरिसमध्ये, रॉबर्ट मॉरिस अळ्या बनवणार क्रिप्टोग्राफर, UNIX ऑपरेटिंग सिस्टमचा भाग म्हणून हॅशेड पासवर्ड सेव करण्यासाठी एक सिस्टम तयार करतो. एन्क्रिप्शनचा हा सुरवातीचा पासवर्ड हा नंबर मध्ये सेव करण्यात आला होता.

**जाणून घ्या पासवर्ड च्या पद्धती**

वैकल्पिक पद्धती : आज बऱ्याच प्रमाणात लोक पासवर्ड वापरतात. परंतु काही वेळेस वेॅलिश्रश व्हेरिफिकेशन साठी सुद्धा ही पद्धत वापरली जाते जेणेकरुन वापरकर्त्यांना सहज क्रॅक किंवा तडजोड करता येईल अशा संकेतशब्दांवर अवलंबून राहण्याची गरज नाही. या मध्ये अनेक पर्याय उपलब्ध असतात ते खालीलप्रमाणे:-

1) Two-factor authentication (2FA)
2) Biometrics
3) Multifactor authentication (MFA)
4) Tokens
5) One-time passwords (OTP)
6) Social login

**पासवर्ड ठेवण्याचे फायदे (advantages of password)**

आपण कोणतेही नवीन अकाउंट असो त्याला पासवर्ड ठेवतो, कारण आपले अकाउंट कोण हॅक करणार नाही किंवा आपली अकाउंट मधली माहिती कोण पाहणार नाही मग ते ATM च असो किंवा मग सोशल मीडिया चे अकाउंट असो.

एकदा की आपण पासवर्ड ठेवला की आपल्याला सुरक्षा लाभते त्यामुळे आपण बिनधास्त पणे राहू शकतो. आज आपण पासवर्ड ठेवण्याचे फायदे तसेच पासवर्ड ठेवण्याचे तोटे दोन्ही पाहणार आहोत.

१) पासवर्ड ठेवण्याने आपले अकाउंट कोण हॅक करू शकत नाही.

२) पासवर्डमुळे आपल्या अकाउंट ची सुरक्षा चांगली होते.

३) आपली गुप्त माहिती कोण पाहू शकत नाही.

४) पासवर्ड ठेवताना नेहमी आपल्या लक्षात जो पासवर्ड राहील तो ठेवावा.

५) तुम्ही असा पासवर्ड ठेवा की त्यामध्ये अनेक वर्ड येतील यामध्ये मग small, capital, numeric असे असावे.

**पासवर्ड ठेवण्याचे तोटे (disadvantages of password )**

१) पासवर्ड नेहमी लक्षात राहणार ठेव्हा नाहीतर काही वेळेस पासवर्ड आठवत नसल्याने



**Mr. Deepak Salgar**
NETWORK ENGINEER
SDO OFFICE AUSA
RENAPUR
9028365002

आपल्या अकाउंट ला अडचण येते.

२) तुम्हाला जर पासवर्ड आठवत नसेल तर तुम्ही कोणाची तर मदत घ्या नाहीतर काही वेळेस अकाउंट लॉक होते.

३) पासवर्ड जर सरळ आणि साधा असेल तर तुमच्या अकाउंट ला हॅकर पासून धोका असू शकतो.

४) तुम्ही जेव्हा ATM मध्ये जाल त्यावेळी पिन टाकताना जिथे बटन्स असतात त्याच्यावर क्लिक करताना आपला हात झाकून ठेवा कारण काही लोक असे असतात की वरती कॅमेरा फिट करतात त्यामुळे सुद्धा तुम्हाला धोका असू शकतो.

**क्रमशः**

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशीत केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770







# यूट्युब पाहून शेतकऱ्याने ४० गुंठ्यांमध्ये केली फळबाग लागवड, काही वर्षात झाला श्रीमंत

कालानुसार शेतीतही आधुनिक बदल झाले आहेत. शेतीची पद्धत सोपी व्हावी आणि उत्पन्न वाढावे यासाठी रोज नवनवीन यंत्रे व तंत्रे शोधली जात आहेत. तसेच आता लोक पारंपारिक पिके घेण्याऐवजी फलोत्पादनात अधिक रस घेत आहेत. विशेष म्हणजे बागायती पिकांची लागवड करण्यासाठी शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण दिले जात नाही. ते स्वत: यूट्यूब आणि सोशल मीडियाच्या मदतीने बागकामाचे बारकावे शिकत आहेत. देशात असे अनेक शेतकरी आहेत, ज्यांनी यूट्यूबवर व्हिडीओ पाहून फुले आणि फळांची लागवड करण्यास सुरुवात केली आहे, ज्यामुळे त्यांना चांगले उत्पन्न मिळत आहे. बलवीर सरन हे त्या शेतकऱ्यांपैकी एक आहेत.

शेतकरी बलवीर सरन हे राजस्थानमधील नागौर येथील कटिया गावचे रहिवासी आहेत. बलवीर सरन यांनी आपल्या मोबाईलचा अचूक वापर केला आहे. यूट्यूबवर व्हिडिओ पाहून त्यांनी ४० गुंठे जमिनीत शेती सुरू केली आहे. विशेष बाब म्हणजे सारण यांनी २० गुंठ्यात बागायती केली असून त्यात डाळिंब, कोरफड, नेपियार गवत आणि बिझारो लिंबू पिके लावली आहेत. त्यामुळे त्यांना लाखो रुपयांचे उत्पन्न मिळत आहे.

शेतकरी बलवीरने सांगितले की, २०१६ मध्ये त्याने यूट्यूबवर सेंद्रिय शेतीचा व्हिडिओ पाहिला होता. यानंतर त्यांच्या मनात सेंद्रिय बागकाम करण्याचा विचारही आला. यानंतर त्यांनी हळूहळू आपल्या जमिनीवर बागकाम करण्यास सुरुवात केली. सर्वप्रथम त्यांनी डाळिंबाची रोपे लावली होती. तीन वर्षांत डाळिंबाच्या झाडावर फळे येऊ लागली, त्यामुळे चांगले उत्पन्न मिळाले. त्यांच्या बागेतील डाळिंब तीन महिन्यांत पिकतात आणि तयार होतात. त्यामुळेच अधिक नफा मिळाल्याने त्यांच्या बागायती क्षेत्रामध्ये वाढ होत राहिली. आज त्यांच्या बागेत डाळिंबाशिवाय अनेक फळझाडे लावली आहेत. विशेष म्हणजे बलवीर सरन हे इतर शेतकऱ्यांसाठी एक उदाहरण बनले आहेत. इतर तरुण शेतकरीही त्यांच्याकडून सेंद्रिय शेतीचे बारीकसारीक मुद्दे शिकायला येतात.

सेंद्रिय शेतीमुळे बलवीर सरन यांची नागौर जिल्ह्यातील यशस्वी शेतकरी म्हणून गणना होते. तो सांगतो की, मी जेव्हा शेती करायला सुरुवात केली, तेव्हा मला विश्र्वासच बसला नव्हता की मी इतके चांगले कमावेन आणि मी दूरवर प्रसिद्ध होईल. मात्र जसजसा काळ पुढे सरकत गेला तसतसे बलवीर यांना फळबागांमध्ये यश मिळाले आणि आज तो एक यशस्वी शेतकरी बनला आहे.

# डाळींबाची कोण जात शेतकऱ्यांसाठी उपयुक्त, जाणून घ्या..

सध्या डाळींब शेतीला चांगले दिवस आले आहेत. यामुळे शेतकऱ्यांना चार पैसे मिळू लागले आहेत. यासाठी योग्य जात महत्वाची आहे. लागवडीमध्ये उच्च उत्पादनासाठी आपण ज्या जातींची लागवड करतो ते अतिशय महत्त्वाच्या असतात. अशाच डाळिंबांच्या जातीबद्दल जाणून घ्या. १) गणेश: या प्रकारच्या डाळिंबाचे फळ आकाराने खूप मोठी असते. मोठी, साल लाल आणि पिवळ्या रंगाचे मिश्रण असते. बिया मऊ गुलाबी असतात. ही महाराष्ट्रातील व्यावसायिक शेती आहे. एका झाडापासून सरासरी उत्पादन ८ ते १० किलो असते.

ही जात १९३६ मध्ये विकसित करण्यात आली. १९७० मध्ये त्याचे नाव ॲलन डी वरून बदलून गणेश असे करण्यात आले. या जातीच्या एका फळाचे वजन २०० ते ३०० ग्रॅम असते. गोड, रसाळ आणि जेवणात रुचकर, त्याच्या दाण्यांचा रंग हलका गुलाबी असतो. एका झाडाला ८ ते १२ किलो फळ मिळते.

२) कमान : हे फळ गणेश जाती पेक्षा लहान असून मऊ बिया असलेले गडद लाल आहे.

३) मऊ : बिया गडद लाल आहेत त्यात मुख्यत: गणेश प्रकाराचा समावेश आहे.

४) बहर : सरासरी प्रत्येक फळांचे वजन सुमारे २५० ते ३०० ग्रॅम असते.

५) मस्कत : या प्रजातीच्या फळांमध्ये गुलाबी बिया असतात. ज्यांचा वरचा भाग लाल असतो. फळांचे वजन सरासरी ३०० ते ३५० ग्रॅम असते.

६) ज्योतिष : हा प्रकार आयआयएचआर, बेंगलोरने विकसित केला आहे. फळे मोठी, चमकदार रंगाची असतात. आणि बिया जास्त रसाने मऊ असतात.

या प्रकारची फळे दुष्काळ सहन करतात कारण ती झाडांच्या फांद्यामध्ये असतात.

तुमच्या बागेत ही पाच झाडे लावा, तुमच्या घराची हवा पूर्णपणे करतील स्वच्छ

७) रुबी :हे प्रजाती देखील आयआयएचआरने बंगळुरूमध्ये विकसित केले आहे. साल लालसर तपकिरी असते.आणि हिरव्या रेषा लाल असतात.

फळांचे वजन २७० ग्रॅम आहे आणि सरासरी उत्पादन १६ ते १८ टन प्रति हेक्टर आहे.

८) ढोलका : फळे आकाराने खूप मोठी आहेत आणि विशेषत: गुजरातमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढतात.



# नव्या शेततळ्यांसाठी ४६ कोटींचा निधी, शेतकऱ्यांना होणार फायदा

सध्या राज्यात नव्याने १०२३ शेततळ्यांची खोदाई करणाऱ्या शेतकऱ्यांना साडेसहा कोटी रुपयांचे अनुदान वाटप करण्यात आले आहे. आता मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेतून नव्या शेततळ्यांची खोदाई करण्यासाठी ४६ कोटी रुपये विविध जिल्ह्यांना उपलब्ध करून दिले आहेत.

पावसामुळे नव्या शेततळ्यांची खोदाई शेतकऱ्यांनी तूर्त थांबवली आहे. मात्र दिवाळीनंतर या योजनेला पुन्हा गती मिळेल. कृषी आयुक्तालयाने या योजनेतील ऑनलाइन त्रुटींचा अभ्यास करीत त्या दूर केल्या आहेत.

त्यामुळे योजनेत सुटसुटीतपणा आला आहे. दरम्यान, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन विभागाचे संचालक रवींद्र भोसले व सहसंचालक पांडुरंग शेळके यांच्याकडून शेततळे योजनेला वेग देण्यासाठी सातत्याने आढावा घेतला जात आहे.

शेतकऱ्यांनी १७०० शेततळ्यांची कागदपत्रे ऑनलाइन अपलोड केली आहेत. यातील ५०० तळ्यांचे अनुदान अदा करण्यास मंजुरी मिळाली आहे. शेततळे खोदाईत पुणे विभाग आघाडीवर आहेत.

कृषी सहसंचालक रफिक नाईकवाडी यांच्याकडून आयुक्तालयापासून ते थेट शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत या योजनेचा पाठपुरावा सुरू आहे. यामुळे सध्या शेतकऱ्यांना याचा फायदा होतोय. राज्यात शेततळयासाठी ५५ हजार शेतकऱ्यांना सोडत लागलेली आहे. त्यापैकी १५ हजार शेतकऱ्यांनी तळे खोदाईची तयारी दर्शविली. दरम्यान, शेततळ्यांसाठी जिल्हानिहाय देण्यात आलेले अनुदान वापरले न गेल्यास निधी परत जात नाही. त्याऐवजी शिल्लक निधी गरज असलेल्या जिल्ह्यांना पाठविला जात आहे.

# छोटीशी गोगलगाय करले पिकांचा नाश, हा उपाय करा हाईल सुटका

जुलै महिन्याचा दुसरा पंधरवाडा गोगलगायीद्वारे अंडी टाकण्याचा राहणार आहे. जुलै महिन्याचा पहिला पंधरवाडा गोगलगायीच्या प्रभावी नियंत्रणासाठी निर्णायक राहणार आहे. त्यामुळे पहिल्या पंधरवाड्यातच सर्व शेतकऱ्यांनी मोहीम स्वरूपात गोगलगायीचे एकात्मिक व्यवस्थापन करावे, असे आवाहन कृषि विभाग व कृषि विद्यापीठाने केले आहे.

सर्वसाधारण गोगलगायी ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात जमिनीखाली सुप्तावस्थेत जातात आणि जून महिन्यात चांगला पाऊस होताच त्या सुप्तावस्थेतून बाहेर येऊन जमिनीच्यावर येतात. मागीलवर्षी सुप्तावस्थेत गेलेल्या गोगलगायी चालू वर्षातील जून महिन्याच्या शेवटच्या



आठवडयात झालेल्या पावसानंतर सुप्तावस्था संपवून जमिनीच्या वर आलेल्या आहेत.

**गोगलगायी वाढण्याचा हंगाम**

सध्या मागीलवर्षी गोगलगायीच्या प्रादुर्भावामुळे दुबार पेरणी कराव्या लागलेल्या क्षेत्रामध्ये गोगलगायीचा प्रादुर्भाव जास्त आढळून येत आहे. सुप्तावस्था संपवून जमिनीवर आलेल्या गोगलगायी पहिल्या पंधरा दिवसात समान आकाराच्या गोगलगायीशी संग करून पंधरा दिवसानंतर जमिनीच्याखाली प्रत्येक गोगलगाय १०० ते १५० अंडी टाकणार आहे.

या अंड्याद्वारे गोगलगायीची पुढील वर्षाची पिढी तयार होणार आहे. त्यामुळे अंडी टाकण्याच्या अगोदर जर आपण गोगलगायीचे नियंत्रण केले तर चालू हंगामातील सोयाबीन पिकाबरोबरच पुढील वर्षातील सोयाबीन पिकाचे संरक्षण होण्यास मदत होणार आहे, असे सोयाबीन अभ्यासक डॉ. अरुण गुट्टे यांनी सांगितले.

**गोगलगायींचे एकात्मिक व्यवस्थापन**

गोगलगायी सोयाबीन पिकाचे रोपावस्थेत मोठ्या प्रमाणात नुकसान करतात. त्यामुळे रोपावस्थापूर्वीच गोगलगायीचे नियंत्रण करणे आवशयक आहे. सध्या सुप्तावस्थेतून बाहेर आलेल्या गोगलगायी दररोज सकाळी ६ ते ८ च्या दरम्यान बांधाच्या बाजूने आढळून येत आहेत.

त्यामुळे गोगलगायीच्या प्रभावी नियंत्रणासाठी गावातील सर्व शेतकऱ्यांनी मोहीम स्वरुपात सकाळी ६ ते ८ च्या दरम्यान शेतात जाऊन जमिनीच्या वर आलेल्या गोगलगायी गोळा कराव्यात. गोळा केलेल्या गोगलगायी कुठेही न टाकून देता साबणाच्या किंवा मिठाच्या पाण्यात टाकून नष्ट कराव्यात किंवा गोळा केलेल्या गोगलगायींवर मीठ किंवा चुन्याची भुकटी टाकावी, असा सल्ला डॉ. गुट्टे यांनी दिला आहे.

**असं करा गोगलगायींचं नियंत्रण**

सुतळीचे बारदाने गुळाच्या पाण्यात भिजवून आदल्या दिवशी बांधाच्या बाजूने रॅन्डम पद्धतीने टाकावेत. दुसऱ्या दिवशी सकाळी बारदान्याखाली जमा झालेल्या गोगलगायी गोळा करून मिठाच्या अथवा साबणाच्या पाण्यात टाकून नष्ट कराव्यात. गोगलगायी गोळा करताना हातात हातमोजे घालणे आवशयक आहे, असेही डॉक्टर सांगतात.

# तुमच्या बागेत ही पाच झाडे लावा, तुमच्या घराची हवा पूर्णपणे करतील स्वच्छ



शरीर निरोगी ठेवायचे असते, पण काही गोष्टी थेट आपल्या हातात नसतात. या कामासाठी आपण झाडांवर अवलंबून असतो. आज आम्ही तुम्हाला तुमच्या बागेतील अशाच काही खास वनस्पतींबद्दल सांगणार आहोत, ज्यांच्या मदतीने तुम्ही तुमच्या घराची हवा पूर्णपणे स्वच्छ आणि ताजी ठेवू शकता.

स्नेक प्लांट (सॅनसेव्हेरिया): स्नेक प्लांट उत्कृष्ट हवा शुद्ध करणारे आहेत. फॉर्मल्डिहाइड, बेंझिन आणि जाइलीन सारख्या विषारी पदार्थांचे शोषण करताना ते रात्री ऑक्सिजन सोडतात. त्यांची देखभाल कमी आहे आणि प्रकाशाच्या विविध परिस्थितींमध्ये ते वाढू शकतात. ही रोपे तुम्ही घरातील खोल्यांमध्येही सहज लावू शकता. ते सजावटीसाठी तसेच आपल्या कुटुंबाची काळजी घेण्यासाठी उपयुक्त आहेत.

पीस लिली (स्पॅथिफिलम): पीस लिली हवेतून फॉर्मल्डिहाइड, बेंझिन आणि ट्रायक्लोरेथिलीन यांसारखे प्रदूषक काढून टाकण्याच्या क्षमतेसाठी ओळखली जाते. ते आर्द्रतेची पातळी वाढवण्यास आणि घरातील जागांना सौंदर्याचा स्पर्श जोडण्यास देखील मदत करतात. ही झाडे घरात शुद्ध वातावरण निर्माण करतात आणि तुम्हाला निरोगी ठेवतात.

स्पायडर प्लांट (क्लोरोफिटम कोमोसम): स्पायडर प्लांट हवेतून फॉर्मल्डिहाइड, कार्बन मोनॉक्साईड आणि जाइलीन फिल्टर करण्यासाठी प्रभावी आहेत. त्यांची वाढ आणि देखभाल करणे सोपे आहे, ज्यामुळे ते घरातील वनस्पतींसाठी एक लोकप्रिय पर्याय बनतात. हे आपल्या सभोवताल स्वच्छ ऑक्सिजन राखण्यास मदत करते.

बांबू पाम (Chamedoria sephrizii): बांबूचे तळवे हवेतून फॉर्मल्डिहाइड, बेंझिन आणि कार्बन मोनोऑक्साइड काढून टाकण्यासाठी प्रभावी आहेत. ते कमी प्रकाशाच्या परिस्थितीत वाढतात आणि तुमच्या घरातील जागेला उष्णकटिबंधीय स्पर्श जोडू शकतात. घरातील बागेच्या सौंदर्यासोबतच ही झाडे तुमच्या आरोग्यासाठी खूप उपयुक्त आहेत.

कोरफड तशीर (Alo barbadensis): कोरफड केवळ त्याच्या सुखदायक गुणधर्मांसाठीच नाही तर हवा शुद्ध करण्याच्या क्षमतेसाठी देखील ओळखला जातो. हे हवेतून फॉर्मल्डिहाइड आणि बेंझिन साफ करण्यास मदत करते. कोरफड वेरा वनस्पतींना तेजस्वी सूर्यप्रकाश आणि पाण्याचा निचरा होणारी माती आवश्यक असते. तुमच्या घराच्या प्रकाश आणि पर्यावरणीय परिस्थितीसाठी योग्य रोपे निवडण्यासाठी अनेक बॅटन आहेत. नियमित काळजी आणि देखभाल, योग्य पाणी देणे आणि वेळोवेळी पानांची धूळ करणे यासह, या वनस्पतींचे सर्वोत्तम हवा-शुद्धीकरण फायदे सुनिश्चित करतील.

# अंजीराची शेती कशी करावी, किती उत्पन्न मिळेल, जाणून घ्या...

भारतात अंजीर पिकवणे शेतकऱ्यांसाठी खरोखरच महत्त्वाचे आहे कारण ते विकून भरपूर पैसे कमवू शकतात. अंजीर देखील आपल्यासाठी खरोखर चांगले आहे आणि आपल्याला निरोगी ठेवण्यास मदत करू शकते. अंजीरमध्ये जीवनसत्त्वे आणि फायबरसारख्या अनेक चांगल्या गोष्टी असतात. आपण ते ताजे किंवा वाळलेले खाऊ शकता.

तुम्ही आजारी असाल किंवा काही आरोग्य समस्या असल्यास ते तुम्हाला बरे वाटण्यास मदत करू शकतात. लोक औषध बनवण्यासाठीही त्यांचा वापर करतात. अंजीर उगवणारे महाराष्ट्र हे भारतातील अव्वल राज्य आहे. अंजीर महाराष्ट्रात व्यवसाय म्हणून घेतले जाते आणि ते तामिळनाडू, कर्नाटक, गुजरात आणि उत्तर प्रदेशच्या काही भागांमध्ये देखील घेतले जाते.

अंजीराच्या अनेक जाती विकसित केल्या आहेत. काही चांगल्या जाती खालीलप्रमाणे आहेत, पंजाब अंजीर, पुणे अंजीर, मार्शलीस अंजीर, पुणेरी अंजीर. अंजीर वाढवण्यासाठी, तुम्हाला उबदार, कोरडे हवामान आणि चांगली माती असलेली जागा आवश्यक आहे जी खूप ओली नाही. मातीमध्ये विशिष्ट प्रमाणात आंबटपणा असणे आवश्यक आहे आणि त्यातून पाणी सहजपणे वाहून गेले पाहिजे. अंजीरांना चांगली वाढ होण्यासाठी आणि भरपूर फळे येण्यासाठी २५ ते ३५ अंश तापमानाची आवश्यकता असते.

अंजीर पिकवण्यासाठी मोकळी माती लागते. सर्व प्रथम, रोपाचे जुने भाग विशेष मशीनने काढून शेत स्वच्छ करा. नंतर, माती फोडण्यासाठी आणि मोकळी करण्यासाठी दुसरे मशीन वापरा. यानंतर, शेत गुळगुळीत करून सपाट करा. यानंतर, जमिनीत सुमारे ५ मीटर अंतरावर खड्डा खणणे. शेवटी या खड्ड्यांमध्ये अंजिराची झाडे लावा आणि त्यांना थोडे पाणी द्या.

**पेरणी आणि बियाणे प्रमाण**

अंजिराची झाडे हलवण्याची उत्तम वेळ म्हणजे जुलै आणि ऑगस्टमध्ये पावसाळा. हे



करण्यासाठी, आपण एकतर रोपे वाढवण्यासाठी स्वतःची जागा बनवू शकता किंवा त्यांची विक्री करणार्या स्टोअरमधून काही खरेदी करू शकता. प्रत्येक मोठ्या क्षेत्रासाठी आपल्याला सुमारे २५० रोपांची आवश्यकता असेल. झाडे एकमेकांपासून ५ मीटर अंतरावर ठेवण्याची खात्री करा.

बोगस बियाणे, खत विकून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या १४ विक्रेत्यांना दणका, सातारा कृषी विभागाकडून परवाने निलंबित

**वनस्पती सिंचन**

जेव्हा आपण अंजीर पिकवतो तेव्हा आपल्याला हंगामानुसार वेगवेगळ्या वेळी पाणी द्यावे लागते. जर आपण त्यांना पावसाळ्यात लावले, जे सहसा जुलै आणि ऑगस्टमध्ये असते, तर आपल्याला त्यांना पावसापासून जितके पाणी मिळते तितके पाणी द्यावे लागत नाही. हिवाळ्यात दर १४ ते २० दिवसांनी पाणी द्यावे लागते. उन्हाळ्यात, अंजीरच्या झाडांना भरपूर पाणी लागते, म्हणून आपल्याला आठवड्यातून दोनदा पाणी द्यावे लागते. पावसाळ्यात आपल्याला त्यांना पाणी द्यावे लागत नाही, परंतु जर पुरेसा पाऊस पडला नाही तर आवश्यकतेनुसार पाणी द्यावे लागते.

**वनस्पती काळजी**

जर तुम्हाला तुमच्या अंजिराच्या झाडांना जास्त फळे द्यायची असतील तर तुम्हाला त्यांची चांगली काळजी घ्यावी लागेल. एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जमिनीत रोपे लावल्यानंतर वर्षभरात रोपांची छाटणी करणे. जेव्हा तुम्ही झाडे कापता तेव्हा त्यावर एक मीटर उंचीपर्यंत नवीन फांद्या वाढणार नाहीत याची खात्री करा. तसेच, कोणत्याही लांब फांद्या कापून टाका. हे रोपाला नवीन शाखा वाढण्यास आणि निरोगी होण्यास मदत करेल, ज्यामुळे त्याला अधिक फळे येण्यास मदत होईल. प्रत्येक उन्हाळ्यात तुमची अंजीर फळे येईपर्यंत छाटून टाकावीत.

# सिव्हिल इंजिनियरने नोकरी न करता विकली लाल केळी, आता लाखात छापतोय...

महाराष्ट्रात शेती करणाऱ्या या शेतकऱ्याने सिव्हिल इंजिनीअरिंगचे शिक्षण घेतले आहे. शिक्षणानंतर त्यांनी नोकरी न करता शेती करण्याचा निर्णय घेतला. आधुनिक शेती अशा प्रकारे वापरली की त्यातून लाखोंचे उत्पन्न मिळते. ही कथा आहे अभिजीत पाटील यांची. तो महाराष्ट्रातील सोलापूरच्या वाशिंबे गावचा रहिवासी आहे.

तो लाल केळी पिकवतो आणि व्यवसाय करतो. त्याच्या बायोमध्ये अभिजीतने लिहिले आहे की, या फळाची लागवड करणारा तो महाराष्ट्रातील पहिला शेतकरी आहे. अभिजीतने पुण्यातील डीवाय पाटील कॉलेजमधून सिव्हिल इंजिनीअरिंग केले. २०१५ मध्ये जेव्हा नोकरी मिळवण्याची पाळी आली तेव्हा त्यांनी कृषी क्षेत्रात करिअर करण्याचा निर्णय घेतला.

अभिजीतने शेतीत नवनवीन प्रयोग करायला सुरुवात केली. डिसेंबर २०२० मध्ये त्यांनी आपल्या चार एकर जमिनीवर लाल केळीची लागवड केली. उत्पादनाची काढणी जानेवारी २०२२ मध्ये झाली. मग अभिजीतने त्याचे मार्केटिंग कौशल्य वापरले. त्यांनी ही खास केळी सर्वसामान्य बाजारात विकण्याऐवजी पुणे, मुंबई आणि दिल्लीतील रिलायन्स आणि टाटा मॉलसह मोठ्या रिटेल चेनना पुरवली.

लाल केळीचा बाजार त्याच्यासाठी फायदेशीर होता. त्याची किंमत ५५ ते ६० रुपये प्रति किलो आहे. पाटील यांच्या चार एकर शेतीतून ६० टन लाल केळीचे उत्पन्न मिळाले आणि त्यातून त्यांना ३५ लाखांचे उत्पन्न मिळाले. अभिजीतच्या लिंक्डइन अकाऊंटवरही अनेक व्हिडिओ आहेत, ज्यामध्ये त्याने लाल केळीच्या लागवडीशी संबंधित सर्व माहिती दिली आहे.

लाल केळ्यांव्यतिरिक्त, अभिजीत येल्की (वेलची) केळी आणि G9 कॅव्हेंडिश केळीची देखील लागवड करतो. मी तुम्हाला सांगतो की, लाल केळी भारतात इतकी लोकप्रिय नाही. मात्र, ते मेट्रो शहरांमध्ये विकले जाते. लक्झरी हॉटेल्समध्ये याला मोठी मागणी आहे. लाल केळीमध्ये पिवळ्या केळीपेक्षा कितीतरी जास्त पोषक असतात.





त्यात सामान्य केळीपेक्षा कितीतरी जास्त बीटा-कॅरोटीन असते. बीटा-कॅरोटीन रक्तवाहिन्यांमध्ये रक्ताच्या गुठळ्या तयार होऊ देत नाही. कॅन्सर आणि हृदयाशी संबंधित आजार दूर ठेवण्यासही हे उपयुक्त आहे. लाल केळ्यामध्ये व्हिटॅमिन सी देखील भरपूर असते. यामुळे याला चांगली मागणी आहे.

लातूर
भूकंप
http://epaper.dainikbhukamp.com
LATUR BHUKAMP
शनिवार १५ जुलै २०२३


## शैक्षणिक वर्षे २०२३-२४ करिताची वसतीगृह प्रवेश प्रक्रिया सुरु

लातूर : महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग संचलित आदिवासी मुलांचे / मुलींचे शासकीय वसतीगृह, लातूर येथील शैक्षणिक वर्षे २०२३-२०२४ करिताची वसतीगृह प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. तरी प्रवेशासाठी इच्छुक अनुसूचित जमातीच्या (ST) विद्यार्थ्यांनी https://swayam. mahaonline. gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करावेत असे आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह लातूर यांनी एका प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

## महाराष्ट्र राज्य विकास कर्ज २०२३ ची ९.६ टक्के दराने परतफेड

मुंबई : महाराष्ट्र शासनाने पूर्वी खुल्या बाजारातून उभारलेल्या ९.६ टक्के कर्जरोखे २०२३ ची परतफेड १४ ऑगस्ट रोजी करण्यात येणार आहे, असे वित्त विभागाने कळविले आहे. ९.६ टक्के महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२३ अदत्त शिल्लक रकमेची १३ ऑगस्टपर्यंत देय असलेल्या व्याजासह १४ ऑगस्ट रोजी सममूल्याने परतफेड करण्यात येईल. शासनाने उपरोक्त दिनांकास सुट्टी जाहीर केल्यास, राज्यातील अधिदान कार्यालय, कर्जाची परतफेड अगोदरच्या कामाच्या दिवशी करेल. या कर्जावर १४ ऑगस्ट २०२३ पासून व त्यानंतर कोणतेही व्याज अदा करण्यात येणार नाही. दुय्यम सर्वसाधारण खातेवही लेखा किंवा रोखे प्रमाणपत्र यांच्या स्वरुपातील शासकीय रोख्यांच्या नोंदणीकृत धारकाकडील मुदत समाप्ती उत्पन्नाचे प्रदान हे, इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत जमा निधीची सुविधा असलेल्या कोणत्याही बँकेतील धारकाच्या खात्यात जमा करून त्याच्या बँक खात्याचे संबंधित तपशिलांसह प्रदानादेशाद्वारे करण्यात येईल.

# क्रीडामंत्री संजय बनसोडे यांचा बसवेश्वर महाविद्यालयात सत्कार



लातूर : श्री महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयात नवनियुक्त कॅबिनेट मंत्री संजय बनसोडे यांचा संस्थेचे उपाध्यक्ष माधवराव पाटील (तपसे चिंचोलीकर), महाविद्यालयाचे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

यावेळी संस्थेचे संचालक प्रा.जी.एम.धाराशिवे, ॲड.काशिनाथ साखरे, प्रभारी प्राचार्य डॉ.संजय गवई, उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदर्गे, उपप्राचार्य प्रा.संजय पवार, उपप्राचार्य प्रा.बालाजी जाधव, स्टाफ सेक्रेटरी कॅप्टन डॉ.बाळासाहेब गोडबोले, समाजकार्य विभागप्रमुख डॉ.दिनेश मौने, पर्यवेक्षक प्रा.शिवशरण हावळे यांच्यासह विविध सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रारंभी महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय समोरील महात्मा बसवेश्र्वर यांच्या सिंहासनारूढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून कॅबिनेट मंत्री संजय बनसोडे व इतर सर्व पदाधिकाऱ्यांनी अभिवादन केले. त्यानंतर त्यांचा महाविद्यालयाच्या प्राचार्य कक्षामध्ये सत्कार करण्यात आला.

यावेळी कॅबिनेट मंत्री संजय बनसोडे म्हणाले की, महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय हे लातूर शहरातील एक नामांकित महाविद्यालय असून या महाविद्यालयामध्ये ग्रामीण भागातील व सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना ज्ञानार्जनाचे कार्य केले जाते याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करून डॉ.संजय गवई यांची प्रभारी प्राचार्यपदी संस्थेने नेमणूक केली त्याबद्दल सर्व संस्था पदाधिकाऱ्यांचे त्यांनी आभार मानून प्रभारी प्राचार्य डॉ.संजय गवई यांना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ.संजय गवई म्हणाले की, आपली कॅबिनेट मंत्री म्हणून मंत्रिमंडळामध्ये निवड या बद्दल आम्हाला आनंद झाला आहे. आपल्याबद्दल लातूरकरांमध्ये आपुलकी आणि प्रेमाची भावना आहे. आज आपण आमच्या महाविद्यालयामध्ये येऊन सत्कार स्वीकारला त्याबद्दल त्यांनी कॅबिनेट मंत्री संजय बनसोडे व इतर सर्व पदाधिकाऱ्यांचे कार्यकर्त्यांचे आणि महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

# सर्व पात्र नागरीकांनी छायाचित्र मतदार यादीचा विशेष पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत अर्ज भरुन आपले नाव मतदार यादीमध्ये नोंदवावे

## जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. यांचे आवाहन

लातूर : लातूर जिल्ह्यातील दि. १ जानेवारी २०२४ रोजी १८ वर्ष पूर्ण करणारे नागरिक व अद्याप मतदार म्हणून नोंदणी केली नसेल अशा सर्व पात्र नागरीकांनी छायाचित्र मतदार यादीचा विशेष पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत विहित नमुन्यातील अर्ज भरुन (आवश्यक कागदपत्रासह) आपले नाव मतदार यादीमध्ये नोंदवावे, असे अवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी पृथ्वीराज बी.पी. यांनी केले आहे.

या कार्यक्रमांतर्गत दि. १ जून, २०२३ ते दि. १६ ऑक्टोबर, २०२३ पर्यंत पूर्व पुनरिक्षण कार्यक्रम भारत निवडणुक आयोगाने निर्धारीत केला आहे. या पुनरिक्षण कार्यक्रमानुसार दिनांक १७ऑक्टोबर, २०२३ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार असून अंतिम मतदार यादी दि. ५ जानेवारी, २०२४ रोजी प्रसिद्ध होणार आहे. दि. १ जानेवारी, २०२४ रोजी १८ वर्ष पूर्ण करणारे नागरिक मतदार म्हणून नोंदणीस पात्र होणार आहेत. नुकत्याच पार पडलेल्या विशेष पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत मतदार म्हणून नोंदणी झालेली नाही अथवा आपण अद्याप मतदार म्हणून नोंदणी केली नसेल अशा नागरिकांना छायाचित्र मतदार यादींच्या विशेष पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत आपले नाव मतदार म्हणून नोंदवता येणार आहे.

नागरीकांना आपले नाव मतदार यादीत तपासण्यासाठी https://ceoelection. maharashtra. gov. in/ search या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा Voter Helpline App या मोबईल ॲप चा वापर करावा. तसेच, यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेली मतदार यादी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांच्याकडे उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

लातूर जिल्ह्यातील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) हे दि. २१ जूलै २०२३ ते दि. २१ ऑगस्ट २०२३ या दरम्यान घरोघरी भेटी देणार आहेत. मतदार नोंदणी न झालेले पात्र नागरीक संभाव्य मतदार, मयत, कायमस्वरुपी स्थलांतरीत व अस्पष्ट फोट असणारे मतदार यांचे सर्वे करणार आहेत. या संदर्भात ERO/AERO यांचे आज जिल्हा निवडणूक अधिकारी लातूर तर्फे प्रशिक्षण घेण्यात आले आहे. सर्व मतदारसंघामध्ये SSR- 2024 चे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांचे प्रशिक्षणास सुरुवात झाली आहे.

या मतदार यादीमध्येही आपले नावाची तपासणी करता येईल. जिल्ह्यातील सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांना मतदान केंद्रस्तरीय सहायक (BLO) यांना या मोहिमेस उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

या कार्यक्रमांतर्गत लातूर जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी व मतदान केंद्र येथे नागरीकांकडून नाव नोंदणीसाठी विहित नमुन्यातील अर्ज स्विकारले जातील. तसेच मतदार म्हणून नोंदणी करण्यासाठी किंवा आपल्या नोंदीमध्ये दुरुस्ती करण्यासाठी आपणास https://www. nvsp. in, Voter Helpline App (Mobile App). https:// voterportal. eci.gov.in संकेत स्थळाला भेट देता येईल.

# मनपा शाळा क्र. ५ मध्ये वृक्षारोपण

लातूर : भारतरत्न इंदिरा गांधी मनपा शाळा क्र. ०५ आनंदनगर, लातूर येथे आज वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. हा कार्यक्रम ग्रीन लातूर वृक्ष टीम व मनपा शाळा क्रं ०५ च्या संयुक्त विद्यमानाने घेण्यात आला, यात उंच वाढणारी व सुगंधी फुलाची आकाश मोगऱ्याची ४२ मोठी वृक्ष लावण्यात आली.



वृक्षारोपणपूर्वी शाळेतील मुले, पालक, शिक्षक, ग्रीन लातूर वृक्ष टिम च्या सर्व सदस्यांनी हातात वृक्ष घेऊन झाडे लावा झाडे जगवा या घोषणा देत दिंडी काढण्यात आली. याप्रसंगी ग्रीन लातूर वृक्ष टीम च्या सर्व सन्माननीय सदस्यांचे शाळेच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तसेच डॉ. पवन लड्डा यांनी मुलांना व शिक्षक कर्मचाऱ्यांना इको ब्रिक्स बनवण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले व हि शाळा भविष्यात आकाशमोगरा शाळा म्हणून ओळखली जाईल असे मत ॲड वैशाली यादव यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी ग्रीन लातूर वृक्ष टीमचे डॉ. पवन लड्डा, पद्माकर बागल, वैशालीताई यादव, सुलेखा कारेपूरकर, राहुल माने, नागसेन कांबळे, ओमकार सदरे, पांडुरंग बोडके, रामा पाटील, विजय मोहित, दयाराम सुडे, भराटे, देशमुख, हर्षदा बाच्चेपल्लीकर तसेच, शिक्षणाधिकारी जाधव साहेबराव, रघुनाथ मदने (जनसेवक फाउंडेशन), सुनील कांबळे (SI मनपा लातूर), उमेश कांबळे (संपादक द सरफरोश), आळंद सर, बिजापूरे सर, तसेच इतर मनपा शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या छोटेखानी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. पांचाळ सर, प्रास्ताविक श्री. शिंदे सर, आभारप्रदर्शन शाळेचे मुख्याध्यापक श्री. काळे सर यांनी केले. तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या शिक्षिका श्रीम. दौंड मॅडम व श्रीम राजेगावकर मॅडम यांनी मेहनत घेतली.

# वीजबिलातील सवलतींचा लाभ घ्या-लोकेश चंद्र

लातूर : महावितरणच्या ग्राहकांनी तत्पर बिल भरणा, ऑनलाईन पेमेंट व गो ग्रीनच्या सुविधेमुळे वीजबिलात मिळणाऱ्या सवलतींचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले.

उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वीज ग्राहकांना दर्जेदार, गुणवत्तापूर्ण व ग्राहकाभिमूख सेवा देण्याची सूचना केली आहे. त्यानुसार अधिकाधिक वीजग्राहकांना वीजबिलातील सवलतीचा लाभ मिळवून देण्यासाठी महावितरणने पुढाकार घेतला आहे.

वीज ग्राहकांनी मुदतीपूर्वी वीजबिलाचा भरणा केला तर त्यांना प्रॉम्प्ट पेमेंटसाठी अर्थात तत्पर बिल भरणा केल्याबद्दल एक टक्का सवलत मिळते. हे बिल भीम प, गुगल पे, पेटीएम किंवा बँकेच्या पवरून किंवा महावितरणच्या वेबसाईटवरून असे ऑनलाईन पद्धतीने भरले तर पाव टक्का सवलत मिळते. याखेरीज ग्राहकांनी छापील कागदी बिलाच्या ऐवजी ईमेलने बिल स्वीकारण्याचा गो ग्रीनचा पर्यावरण पूरक पर्याय निवडला तर प्रत्येक बिलात दहा रुपये सवलत मिळते.

शंभर युनिट वीज वापरणाऱ्या ग्राहकाने तत्पर भरणा, ऑनलाईन पेमेंट आणि गो ग्रीन या तिन्हीचा वापर केला तर दरमहा किमान वीस रुपयांची म्हणजे वर्षाला २४० रुपयांची सूट मिळते. दोनशे युनिट वीज वापरणाऱ्या ग्राहकाने या तीनही उपायांचा अवलंब केला तर दरमहा ३५ रुपये म्हणजे वर्षाला ४२० रुपयांची सवलत मिळते. महिना तीनशे युनिट वीज वापरणाऱ्या ग्राहकाला तत्पर भरणा, ऑनलाईन पेमेंट आणि गो ग्रीन या तिन्हीचा वापर करून दरमहा ५१ रुपयांची म्हणजेच वर्षाला ६१२ रुपयांची सवलत मिळू शकते. विजेची बिले ऑनलाईन भरणे आणि ती दिलेल्या मुदतीच्या आधी भरणे हे वीज ग्राहकांना सहज शक्य आहे. त्यामुळे त्यांचा वेळ आणि श्रम वाचतात आणि बिलातही सवलत मिळते. त्यासोबत महावितरणच्या वेबसाईटवरून अथवा पवरून एकदा गो ग्रीनसाठी नोंदणी केली तर प्रत्येक बिलात दहा रुपये सवलत मिळत राहते. त्यामुळे अधिकाधिक ग्राहकांनी या सवलतींचा लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले आहे.

# जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सेस योजनेमधून सोयाबीन टोकन यंत्र अनुदान

## शेतकऱ्यांनी पंचायत समितीकडे परिपूर्ण कागदपत्रासह अर्ज करावेत

लातूर : जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना लातूर जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून टोकण यंत्र अनुदानावर डिबीटी (DBT) तत्वावर देण्यात येणार आहेत. या योजनेमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व महिला यांना प्राधान्य राहील. त्यासाठी इच्छुक शेतकऱ्यांनी २१ जुलै, २०२३ पर्यंत आपल्या पंचायत समिती कार्यालयाकडे परिपूर्ण कागदपत्रासह अर्ज करावेत, असे फेर आवाहन कृषि विकास अधिकारी व अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर यांनी केले आहे.

तरी इच्छुक शेतकऱ्यांनी स्वत:चा सातबारा, आठ अ, आधार कार्ड, बँक पासबुकच्या पहिल्या पानाचे झेरॉक्स, लाभार्थी अनु.जाती, अनु. जमातीचे असल्यास जातीचे प्रमाण पत्र व अपंग लाभार्थीसाठी अपंगत्वाच्या दाखल्याच्या झेरॉक्स प्रतिसह आपल्या पंचाय समिती कडे अर्ज करावेत.

लाभार्थ्यांची निवड केल्यानंतर शेतकऱ्यांनी एक महिन्याच्या आत खुल्या बाजारातून अधिकृत विक्रेत्याकडून आपल्या पसंतीच्या औजाराची खरेदी करावी लागेल. हे खरेदी करावयाचे औजारे अधिकृत सक्षम तपासणी संस्थांनी परिक्षण करुन ते B.I.S. अथवा अन्य संस्थानी निश्चित केलेल्या प्रमाणकानुसार / तांत्रिक निकषानुसार असावे लागेल. या औजारासाठी जास्तीचे अर्ज प्राप्त झाल्यास लक्षांकानुसार सोडत पध्दतीने लाभार्थ्यांची निवड संबंधीत पंचायत समिती स्तरावर करण्यात येईल.

मंजुर औजाराचे अनुदान संबंधीत शेतकऱ्यांच्या आधार लिंक असलेल्या बँक खात्यावर DBT प्रणालीव्दारे अदा करण्यात येईल.

# लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

लातूर : जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी विजयकुमार ढगे यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये लातूर जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत १५ जूलै २०२३ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते ३१ जूलै २०२३ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.

या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे.

हा आदेश धार्मिक सभा, अंत्ययात्रा, विवाह, अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री
कलर प्रिंट/झेरॉक्स
B/W प्रिंट/झेरॉक्स
जम्बो झेरॉक्स/प्रिंट
डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो
रिफीलींग/टोनर/फोटो पेपर
लॅमिनेशन मशिन व मटेरिअल
झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :
बोरा झेरॉक्स
व्यापारी धर्मशाळा, महात्मा गांधी चौक, लातूर.
9673344777

श्री.तिरूपती ट्रेडींग कंपनी
शिवाजी चौक, निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:-दु. २४२४६३, मो.९४०४६८२९९९



SINCE 1972
माळवदकर एजन्सीज
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते

# अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा

## प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

लातूर : अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा १९८९ व सुधारित अधिनियम २०१६, बाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर व प्रशिक्षण संस्था बार्टी, पुणे व सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा १९८९ व सुधारित अधिनियम २०१६, बाबत तालुका व जिल्हास्तरीय एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

प्रशिक्षण कार्यशाळा दि.१४.०७.२०२३ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.१५ वाजेपर्यंत कार्यशाळेचे स्थळ:- डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, मार्केट यार्ड, शिवनेरी गेट समोर, डाल्डा फॅक्टरी कंपाऊंड, लातूर येथे आयोजित करण्यात आलेली होती.

या प्रशिक्षण कार्यशाळेची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पन करुन व दिपप्रज्वलन करुन करण्यात आली. सदर कार्यशाळेचे अध्यक्ष प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण विभाग अविनाश देवसटवार लातूर यांनी प्रस्ताविक केले. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), सुभाष केकन यांनी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा १९८९ व सुधारित अधिनियम २०१६, बाबत सखोल असे मार्गदर्शन केले.

प्राध्यापक दयानंद विधी महाविद्यालय लातूर डॉ. जी. लक्ष्मण (कायदा विद्याशाखा), यांनी राज्यघटने विषयी अनमोल असे मार्गदर्शन केले. तसेच ॲड. संतोष देशपांडे व ड. लक्ष्मण शिंदे यांनी सदर अधिनियम अंतर्गत गुन्हे नोंद करताना पोलीस विभागाने कोणती काळजी घ्यावी. तसेच इतर न्यायालयीन प्रक्रियेबाबत मार्गदर्शन या सदर कार्यशाळेत जिल्ह्यातील १२६ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांना चहा, नाष्टा व दुपारच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली होती.



या प्रशिक्षण कार्यशाळेस प्रकल्प व्यवस्थापक, बार्टी नितिन सहारे, प्रमुख व्याख्याते सुभाष केकन, प्रा. डॉ. जी. लक्ष्मण तसेच प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग लातूर, अविनाश देवसटवार, उपायुक्त, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती तेजस माळवदकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर श्रीमती कल्पना क्षीरसागर, जिल्हा माहिती अधिकारी लातूर युवराज पाटील, ङ संतोष देशपांडे ङ लक्ष्मण शिंदे, भागवत फुंदे उपविभागीय पोलीस अधिकारी लातूर (शहर), उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर (ग्रामीण), सुनिल गोसावी, कार्यालय अधिक्षक तथा प्रभारी सहायक आयुक्त समाज कल्याण लातूर, श्रीमती ए. एस. लाखाडे, समाज कल्याण निरिक्षक लातूर संदेश घुगे, सचिन गिरमे (बार्टी) व समाज कल्याण कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थितीत होते. सदर कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी सर्व तालुका समन्वयक व समतादुत (बार्टी) यांनी विशेष सहकार्य केले. कार्यशाळेची यशस्वी सांगता झाली. कार्यशाळेचे सुत्रसंचालन तालुका समन्वयक नागेश जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रीमती ए. एस. लाखाडे यांनी केले व कार्यशाळेचा समारोप नितिन सहारे यांनी केला.

## ४ हजार २७७ खाजगी कंत्राटी प्रवासी बसेसवर कारवाई

मुंबई : राज्यभरातील सर्व परिवहन कार्यालयांतील 'वायुवेग' पथकांमार्फत १४ हजार १६१ खाजगी बसेसची तपासणी करण्यात आली आहे. यापैकी ४ हजार २७७ खाजगी बसेस नियम मोडत असल्याचे निदर्शनास आल्याने या बसेसना तपासणी प्रतिवेदने जारी करुन प्रकरणे नोंदवित कारवाई करण्यात आली आहे. विविध कार्यालयांमार्फत १ कोटी ८३ लक्ष तडजोड शुल्काचा दंड वसूल करण्यात आला आहे.

## CHANGE IN NAME

I have change my name from SUVARNA SANDIPANRAO SHINDE To SUVARNA SANDIPAN SHINDE Hence for this declaration in future.
OLD NAME:- SUVARNA SANDIPANRAO SHINDE
NEW NAME:- SUVARNA SANDIPAN SHINDE
In future the same name will be used by my spouse and children
Address:- FLAT NO. 64, AUSA ROAD, BASWESHWAR COLONY, LATUR, LATUR, MAHARASHTRA, 413512
Aadhar No:- 954626850712
Mobile No:- 9423805819